# बंधुतेचे प्रकाशशिल्प

**बंधुताचार्य प्रकाश रोकडे**

**(अठराव्या राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांचे अध्यक्षीय भाषण.)**

माझिया रक्तात काही जोतिबांचा अंश आहे!
बुद्ध-बाबासाहेबांचा तोच माझा वंश आहे!!

## कृतिशील बंधुतेचा आचारव्यूह आणि विचारव्यूह

सुरुवातीला एका छोट्याश्या कवितेच्या माध्यमातून अत्यंत अंत:करणपूर्वक आपल्या सर्वांचे स्वागत करतो.

मी अगदी मन:पूर्वक स्वागत करतो,
माझ्या परिवारात आलेल्या प्रत्येक माणसाचं कारण
तो असतो कधी साहित्यिक, कधी विचारवंत,
कधी कवी आणि कधी कार्यकर्तासुद्धा.
इतक्या उत्कट प्रेमाने सामील व्हावे असे काय आहे
माझ्या परिवारात?
खरं सांगतो मित्रांनो तुम्हाला...
माझ्या परिवारात आहे तथागतांची शांती,
ज्योतिबांची क्रांती,
महावीरांची अहिंसा,
कबीरांची एकात्मता,
संतांची सहिष्णुता,
छत्रपतींची धर्मनिरपेक्षता,
राजर्षी शाहूंची समता आणि बोधीसत्त्व बाबासाहेबांची बंधुता.
हे माणसांनो, तुम्ही वारंवार या,
या परिवारात एक सुंदर फूल बनून,
कारण आम्हाला पूजा बांधायचीय,
सम्यक् भगिनीभावाची, बंधुभावाची,
स्नेहभावाची आणि संविधानिक लोकशाहीचीसुद्धा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समस्त मानवजातीला पडलेले एक भव्यदिव्य आणि महान असे जणू काही स्वप्नच. त्यांनी आपल्या भक्कम आणि मजबूत अशा विशाल खांद्यावर संपूर्ण बहिष्कृत भारतीयांना घेतले आणि दाखविले -

ते पहा : संपूर्ण मानवजातीला शांतीचा, करुणेचा, अहिंसेचा आणि मानवतेचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध.

ते पहा : षड्रिंपूवर मात करणारे आणि अनेकांतवादाचा संदेश देणारे भगवान महावीर.



ते पहा : एकतेच्या आणि एकात्मतेच्या धाग्याने मानवतेचे महावस्त्र विणणारे संत कबीर.

ते पहा : मानवतेसाठी आणि समतेसाठी दैवाशी आणि देवाशीही विद्रोह करणारे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज.

ते पहा : बंधुभावासाठी पसायदान मागणारे संत ज्ञानेश्वर महाराज.

ते पहा : हे राज्य रयतेचे आहे असे निक्षून सांगून त्याप्रमाणे धर्मनिरपेक्ष राज्यकारभार करणारे छत्रपती शिवाजी महाराज.

ते पहा : शेतकऱ्यांचा आसूड, गुलामगिरी हे ग्रंथ लिहिणारे आणि सत्यशोधकी विचारांची पेरणी करणारे महान क्रांतिकारक समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले आणि त्यांच्याबरोबर स्त्रीमुक्तीच्या महान शिल्पकार ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले.

ते पहा : सत्तेच्या माध्यमातून बहुजन समाजाला आरक्षणाचे महान असे दान देणारे राजर्षि शाहू महाराज.

डॉ. बाबासाहेबांनी या प्रज्ञावंत महापुरुषांचं दर्शन घडवलं आणि स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला आपल्या खांद्यावरून अलगद खाली उतरवलं आणि भक्कम पायावर उभं राहायला शिकवलं. ताठ मानेनं चालायला शिकवलं. शुद्ध बोलायला शिकवलं. चांगलं राहायला शिकवलं आणि कसदार असं लिहायलाही शिकवलं. स्वातंत्र्य मिळताच लोकशाहीचा जाहीरनामा असलेलं 'भारतीय संविधान' त्यांच्या हातात सुपूर्द करून 'आम्ही भारतीय' असं म्हणायला शिकवलं आणि शिकवलं पहिल्या पानावर वाचायला स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता आणि सहिष्णुता. त्या महामानवाच्या म्हणजेच परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरणकमलांना अत्यंत विनम्रपणे स्पर्श करून आपणांशी सुसंवाद साधण्याचा प्रयत्न करतो.

काळ किती गतिमान असतो ना? बघता बघता सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये सातत्यपूर्ण विविधांगी स्वरूपाचे कार्य करणाऱ्या आपल्या बंधुता परिवाराने चक्क पंचविशी पार केली. या कार्यकाळामध्ये आपण काय मिळकत मिळवली याचाही शोध घ्यावा लागेल.

महान समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या उदात्त अशा संकल्पनेतील बहुधर्मियांचा, बहुजातीयांचा, बहुप्रांतीयांचा आणि बहुभाषिकांचा हा बंधुता परिवार. विवेकनिष्ठ, बुद्धिप्रामाण्यवादी, समताधिष्ठित आणि

मूल्याधिष्ठित समाजनिर्मिती हा या परिवाराचा ध्यास आणि श्वास. आज या परिवाराच्या ७/१२ च्या उताऱ्यावर १८ राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलने, विविध विषयांवरील १२ विचारवेध संमेलने, ३ विद्यार्थी आणि शिक्षक साहित्य संमेलने, आरोग्य ज्ञान-विज्ञान संमेलने, साक्षरता अभियान, सामाजिक जाणीव अभियान आणि धर्ममैत्री अभियान, मानवतेचे गाव व्याख्यानमाला, घरोघरी प्रबोधनवारी, आरोग्यरक्षक घरोघरी हे बंधुता ज्ञानपीठाचे अभिनव उपक्रम, आम्ही सावित्रीच्या लेकी आणि केशरमाती, आभाळनाती हे सांस्कृतिक कार्यक्रम, आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन, विविध क्षेत्रातील यशवंतांना पुरस्कारांचे वितरण या आणि अशा शेकडो मिळकतींच्या नोंदी आहेत. किती श्रीमंत आहे ना हा परिवार? कधीही न संपणारी, न हरवणारी ही अक्षय श्रीमंती. या श्रीमंतीसाठी अनेकांचे हात लागले आहेत. अनेकांनी आपली बुद्धी आणि श्रम खर्ची घातले आहेत, अशा सर्वांबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.

## बंधुतेचे महात्म्य

बंधुता हे महनीय मूल्य म्हणजे सर्व मानवी मूल्यांचा एकत्रित चेहरा आणि एकत्रित आविष्कार. या मूल्याचा उच्चार करताच सर्व मानवी मुल्यांचा उद्घोष होतो. म्हणूनच सांगतो मित्रांनो,

**भारत – बंधुता = महाभारत किंवा पुन्हा एकदा बहिष्कृत भारत.**

**आणि**

**भारत + बंधुता + सहिष्णुता = महासत्ता.**

आपल्याला आपल्या देशाला महाभारताकडे न्यावयाचे आहे, की महासत्तेकडे हा आपल्यापुढील जटील प्रश्न आहे. याचे उत्तर अर्थातच महासत्तेकडे. हा प्रवास किती गतीने आणि कोणत्या पद्धतीने करावयाचा याचा विचार करावा लागेल. आपण एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे आहोत. काय घेऊन जाणार आहोत आपण एकविसाव्या शतकात? माझ्या मते आपल्याला एका हातात वैश्विक मूल्यांचा ठेवा, दुसऱ्या हातात अभिव्यक्ती स्वातंत्र्याची लेखणी, अंत:करणात संतांची सहिष्णुता आणि ओठांवर बंधुतेची वाणी आणि गाणी याच गोष्टी घेऊन जाव्या लागतील. तसे केले तर भारताला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही.

एक चिंतन आपल्यासमोर ठेवल्याशिवाय राहवत नाही. रविवारचा दिवस. सकाळची वेळ. माझी नात वैभवी पाच वर्षांची. ती तिच्या आजीच्या अवतीभवती खेळत होती, तितक्यात घराच्या नजिकच्या चौकात कशाचा तरी आवाज सुरू झाला. बहुदा डोंबाऱ्याचा खेळ असावा. बायकोने लागलीच फर्मान सोडले. ‘अहो, वैभवीला घेऊन चौकात जा आणि तो खेळ दाखवा.’ मी लागलीच वैभवीला हाताशी धरले आणि चालत चालत चौक गाठला.

चौकात गोलाकार गर्दी होती. गर्दीमुळे आतील काही दिसत नव्हते, म्हणून वैभवीला घट्टपणे खांद्यावर बसवलं आणि गर्दीच्या आत पाहू लागलो. वैभवी हसत होती, कारण तिला दिसत होते. मला मात्र दिसत नव्हतं. आमच्या दोघाचंही खरं होतं. ‘मी तुमच्यापेक्षा उंच आहे म्हणून मला दिसतंय’ असं वैभवीने म्हणताच मी तिला पटकन खाली उतरवलं आणि म्हणालो, ‘आता पहा कोण उंच आहे ते.’

मी वैभवीला पुन्हा हाताशी धरलं आणि गर्दीला बाजूला सारून आत डोकावलं. सर्वजण बघत होते आणि मी मात्र विचार करत होतो. काय आहे हा खेळ? सत्तांध झालेली सत्तेची प्रतिमा आपल्या गळ्यात अडकविलेला ढोल बेधुंद होऊन बडवत होती आणि समोर अर्धनग्न झालेली लोकशाही आपल्या हातात आसूड घेऊन नाचत होती. आपल्याच अंगावर आसूडाचे फटके मारत होती. प्रत्येक फटक्यागणिक माझ्या कानात वेगळाच आवाज घुमत होता. कधी स्वातंत्र्य, कधी समता, कधी बंधुता, कधी सामाजिक न्याय, कधी धर्मनिरपेक्षता तर कधी सहिष्णुता. जणू काही ती लोकशाही विद्रोहाने टाहो फोडून सांगत होती, मी धोक्यात आहे, माझ्या मूल्यांचे अवमूल्यन होत आहे, तुम्ही लोकशाहीचे खरे मालक आहात, माझे रक्षण करण्याची जबाबदारी तुम्हा नागरिकांचीच आहे. ते पुन्हा पुन्हा मी ऐकत होतो. अचानक तो खेळ बंद झाला आणि मी अधिकच चिंताग्रस्त झालो. बंधुनो, मला जे वाटलं ते आपल्यासमोर मांडलं. त्याची सत्यता पडताळून पाहण्याची जबाबदारी आपली आहे. मात्र हे जर सत्य असेल तर त्याविरुद्ध आपल्याला बंड करावे लागेल. त्यासाठी आपल्याला भूमिका घ्यावी लागेल. कारण भूमिका नसणे हे

जिवंतपणाचे लक्षण नाही. भूमिका नसणे हा भ्याडपणा आहे. भूमिका नसणे हा षंढपणा आहे. भूमिका नसणे म्हणजे पाठीचा कणा नसल्यासारखे आहे. म्हणून भूमिका ही घ्यावीच लागेल. त्यासाठी विधायक पद्धतीने विचार करावा लागेल आणि त्याला कृतीची जोड द्यावी लागेल.

मी विशिष्ट भूमिका घेऊन सातत्याने कार्यरत राहिलो. माझ्या या कृतीकडे आपण डोळस नजरेने पाहिले; आणि बंधुता परिवाराच्या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने गतवर्षी आयोजित केलेल्या १७ व्या राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी एक ऐतिहासिक ठराव सर्वांनुमते संमत करून या १८ व्या राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी माझी निवड जाहीर केलीत, हा माझ्या आयुष्यातील सर्वोच्च सन्मान आहे, असे मी समजतो. आपल्या सर्वांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करतो आणि आपल्याला प्रांजळपणे सांगू इच्छितो की, बंधुता – प्रकाश = काळकुट्ट अंधार. या महनीय मुल्याच्या प्रस्थापनेसाठी मी आपल्या सर्वांच्या सहभागाने जे काही केले त्यामुळेच हे घडू शकले हे सत्य आहे. ते दुर्लक्षित करता येण्यासारखे निश्चितच नाही. म्हणून हा सन्मान माझा व्यक्तिगत नसून बंधुता परिवारातील आपल्या सर्व भावा-बहिणींचा आहे, असे मी अत्यंत नम्रपणे नमूद करतो.

आतापर्यंत महाराष्ट्रामधील विविध ठिकाणी झालेल्या या साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद प्रा. रा. ग. जाधव, डॉ. निर्मलकुमार फडकुले, प्रा. डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. यू. म. पठाण, मा. उत्तम कांबळे, फा. फ्रान्सिस दिब्रिटो, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, मा. भाई वैद्य, डॉ. मा. पं. मंगुडकर, डॉ. सिसिलिया कार्व्हालो, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. रामचंद्र देखणे, न्याय. नरेंद्र चपळगावकर, ॲड. गोविंदभाई पानसरे, ॲड. भास्करराव आव्हाड, डॉ. शरणकुमार लिंबाळे आणि डॉ. अश्विनी धोंगडे या प्रज्ञावंत आणि विचारवंत साहित्यिकांनी भूषविले आहे.

या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये माझी काही अंशी साहित्यिक, लेखक, कवी आणि वक्ता अशी ओळख असली तरी माझा मूळ पिंड हा कार्यकर्त्याचा आहे आणि भविष्यातही हीच जोखीम स्वीकारून मला सामाजिक प्रवास करावयाचा आहे म्हणून कार्यकर्त्याच्या भूमिकेतूनच आपल्याशी सुसंवाद साधण्याचा मी प्रयत्न करतो आहे. कारण कार्यकर्ता हा समाजातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे असे मी मानतो. कार्यकर्ता म्हणजे समाजाच्या जिवंतपणाचे लक्षण होय.

कार्यकर्त्याची भूमिका आणि बंधुता संमेलनाचे वेगळेपण

साहित्यिक, विचारवंत, कवी लिहितात आणि आपले अस्तित्व टिकवितात; परंतु क्षेत्र कोणतेही असो, शैक्षणिक असो वा सामाजिक, सांस्कृतिक असो वा राजकीय ही क्षेत्रे अधिक व्यापक आणि यशस्वी करण्यामध्ये कार्यकर्त्याची भूमिका अतिशय मोलाची असते. त्या त्या क्षेत्रातील अधिकारी मंडळी आणि समाजातील शेवटचा घटक यांच्यातील महत्त्वपूर्ण दुवा असतो कार्यकर्ता. त्याच्याही काही कल्पना असतात. वैयक्तिक आणि सार्वजनिक अशा भूमिका असतात. तो काही स्वप्ने उराशी बाळगून अहोरात्र सातत्याने कार्यरत असतो. कार्यकर्त्याचे समाजाप्रती अतिशय उत्कट असे प्रेम असते. त्यासाठी तो दु:खाची नांगरट करतो आणि मग सुखाच्या अमाप अशा पिकाची अपेक्षा व्यक्त करतो. म्हणूनच सर्वसामान्य माणसाचा राज्यकर्त्यावर नव्हे; तर कार्यकर्त्यांवर अधिक विश्वास असतो. या विश्वासावरच तो कोणत्याही क्रांतीची मशाल आपल्या हाती घेत असतो. आपली भूमिका आणि त्यासाठी केलेले कार्य हे लिखित स्वरूपात समाजासमोर ठेवले नाही, तर त्याचे ध्येयनिष्ठ आणि त्यागमय कार्य चिरकाल टिकत नाही आणि तत्कालीन इतिहासामध्ये त्याच्या कामाची नोंद होत नाही. म्हणून त्याने अधिक प्रगल्भ आणि व्यापक व्हायला हवं. स्वत:ला सिद्ध करायला हवं. स्वयंभू व्हायला हवं, हे बंधुता साहित्य संमेलनाचे उद्दिष्ट आहे. हे फक्त कार्यकर्ता संमेलन नसून बंधुता साहित्य संमेलन आहे, याचे मला पूर्ण भान आहे. तरीही सर्वच क्षेत्रातील कर्त्या कार्यकर्त्यांना लिहिते करणे आणि बोलते करणे हा या साहित्य संमेलनाचा उद्देश आहे.

साहित्य हा समाजजीवनाचा आरसा असतो. समाजजीवनाचे प्रतिबिंब त्यात उमटते. इतिहासाचे भान ठेवून भविष्याचा वेध घेण्यासाठी साहित्याची निर्मिती होते. परिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणून त्याकडे पाहिले जाते. साहित्य हे आत्मभान देते, म्हणूनच साहित्य आणि साहित्य संमेलनाची गरज असते.

विशिष्ट भाषेची प्रतिष्ठा वाढविणे, त्या भाषेतील साहित्य वाढविणे, वाचकवर्ग निर्माण करणे, वाचनाची गोडी लावणे, चांगल्या प्रतीची पुस्तके निर्माण करणे, त्याचप्रमाणे नवोदित कवी, लेखक, पत्रकार, कलावंत यांना संमेलनाद्वारे प्रोत्साहन देणे या उद्देशाने साहित्य संमेलने आयोजित केली जातात. परंतु या साहित्य संमेलनाचा फक्त एवढाच मर्यादित उद्देश नाही. स्वयंभू अशा कार्यकर्त्यांची

पिढीच निर्माण करणे हासुद्धा या साहित्य संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी साहित्यिक, कलावंत आणि कार्यकर्तेयांचा परस्परांशी समन्वय असायला हवा, असे माझे प्रामाणिक मत आहे. कारण सामाजिक सेवा आणि सांस्कृतिक सेवा याचा मिलाप या संमेलनाच्या मुळाशी आहे. त्यातून निश्चितपणे कृतिशील बंधुता निर्माण होईल, असा मला विश्वास वाटतो.

या साहित्य संमेलनाच्या मुळाशी कृतिशील बंधुतेचा आचारव्यूह आणि विचारव्यूह आहे. बंधुताप्रेरित आणि बंधुतासाधक समाजसेवेला चालना देण्याचा उद्देश आहे. माणसामाणसांमधील बंधुभाव, भगिनीभाव, स्नेहभाव आणि सेवाभावाच्या अभावाची जी जी रूपे अस्तित्वात आहेत किंवा अशाप्रकारच्या अभावरूपांना ज्या ज्या गोष्टी कारणीभूत आहेत, त्या त्या सर्वांचे प्रकटपणे निर्मूलन करणे, हे खरे बंधुतेच्या सेवाकार्याचे उद्दिष्ट आहे.

समाजातील भेदाभेद, उच्चनीचता, विषमता इत्यादींच्या मुळावरच घाव घातल्याशिवाय बंधुतेची खरी रूपे व सेवाकार्य यांची रुजवण होणार नाही हे खरेच आहे. परिवर्तनवादी दर्शनांचा आणि दार्शनिकांचा जो अंश मनुष्यसमाजाच्या वृत्तीवर्तनात मुरलेला आहे आणि समाजसेवेची जी प्रदीर्घ परंपरा आहे तिचा वारसा हा बंधुतेचा आचारव्यूह निश्चितच स्वीकारतो. त्यात सेवेची प्रेरणा आहे, सत्तेची व प्रभुत्वाची आकांक्षा नाही. त्यात माणसाची नाना दुःखे आणि संकटे समरसून पाहण्याची आणि ती निवारण्याची कळ आहे. माणसाच्या आधीव्याधी, अगतिकता, अपंगता, असहाय्यता, अनाथता यांना सक्रिय प्रतिसाद देण्याची ओढ आहे. माणसाच्या व्यथावेदनांना माणुसकीच्याच विशुद्ध स्वरूपात ओळखण्याची असोशी आहे. माणसाच्या शारीरिक, आर्थिक दुःखदैन्यांना माणूसपणा एवढीच जात असते. तेवढाच एक धर्म असतो. तेवढाच देव आणि देश असतो. एकप्रकारची ही एक धर्मनिरपेक्ष वृत्ती होय. व्रतस्थ वृत्ती होय. हे मिशन, हे व्रत माणूस नावाच्या देवधर्मासाठी स्वीकारले जाते. हे साहित्य संमेलन आणि सेवाकार्य बंधुतेच्या आचारव्यूहाचे आणि विचारव्यूहाचे प्रतीकच आहे.

हे संमेलन काहीसे इतर साहित्य संमेलनासारखे आणि थोडेसे त्याच्यापेक्षा वेगळे आहे. साहित्यिक भूमिकेबरोबरच काही एकप्रकारची साहित्यबाह्य भूमिकाही या संमेलनामागे आहे. स्वयंसेवी क्षेत्रात कार्य करणारे कार्यकर्तेआणि साहित्यक्षेत्रातील साहित्यिक तथा विचारवंत यांना एकत्र आणून दोहोंमध्ये काही सुसंवाद व्हावा, अनुभवांची आणि विचारांची देवाणघेवाण व्हावी या आणि अशा संवादप्रक्रियेतून काही एक प्रकारची फलश्रुती दोहोंना व्हावी अशी या संमेलनाची भूमिका आहे. स्वयंसेवी क्षेत्रातील कार्यकर्तेआणि साहित्यिक यांना एकत्र आणण्याची भूमिका कोणत्याही विशिष्ट विचारप्रणालीशी, राजकीय पक्षांशी अथवा मंच वा संघटनेशी बांधील नाही. ती भूमिका केवळ बंधुतेशी आणि बंधुताप्रेरित वा बंधुतासाधक सेवाकार्याशी बांधील आहे. त्याचप्रमाणे साहित्य हेही ह्या भूमिकेत अभिप्रेत आहे. साहित्याच्या आणि समाजकार्याच्या अशा दोन्हीही क्षेत्रातील कुण्या प्रस्थापितांच्या, सकळांच्या किंवा विद्रोहकांच्या रागालोभातूनही या साहित्य संमेलनाचा जन्म झालेला नाही. समाजसेवेच्या आणि साहित्यसेवेच्या क्षेत्रात नवा सुभा वा सुभेदार निर्माण करण्याचा हा प्रयत्न नाही. तर साहित्यिक आणि त्यांची साहित्यनिर्मिती, तसेच सेवाभावी कार्यकर्तेआणि त्यांचे समाजकार्य या दोहोंमधील आंतरक्रिया वाढविणारा हा प्रामाणिक प्रयोग आहे. कारण ही दोन्हीही क्षेत्रे एकमेकांना पूरक आणि प्रेरक अशीच आहेत. निकोप, निरोगी, सजग आणि सुंदर समाजनिर्मिती करणे हाच त्यांचा ध्यास आहे.

समाजकार्याच्या विकसनशील क्षेत्रात भरपूर दालने आहेत. अज्ञान, दारिद्र्य, बेकारी, रूढी, परंपरा, अंधश्रद्धानिर्मूलन, व्यसनमुक्ती, वृद्धांच्या समस्या, वेश्या व देवदासींचे प्रश्न, मूकबधीर तथा मनोरुग्णांचे प्रश्न, निराधार परित्यक्त्यांचे प्रश्न, विकलांगांचे प्रश्न, दारिद्र्यपीडितांचे आणि बेरोजगारांचे प्रश्न यांनी समाजसेवी कार्यक्षेत्र व्यापलेले आहे. साहित्यसेवक आणि समाजसेवक यांच्या परस्पर संबंधातून समाजाचे खऱ्या अर्थाने प्रबोधनही होईल आणि या समस्यांचे निराकरणही होईल, असे मला वाटते.

बहुधर्मियांना आणि बहुभाषिकांना सामावून घेण्यासाठी 'गर्व से कहो हम बंधु है।' असा या संमेलनाचा नारा आहे. 'विचार पेरा कृती उगवेल', त्याचप्रमाणे 'विचाराशिवाय गती नाही आणि गतीशिवाय प्रगती नाही' हा या संमेलनाच्या मुळाशी दूरदर्शी आणि पारदर्शी असा विचार आहे.

## मदर तेरेसा यांना संतपद

बहुजन समाजाच्या प्रदीर्घ अशा संघर्षानंतर महाराष्ट्र शासनाने ३१ जुलै २०१४ पासून पुणे विद्यापीठाचे 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' असे नामकरण केले. त्यानंतर आता नुकतेच म्हणजे ४ सप्टेंबर २०१६ रोजी मदर तेरेसा यांना आंतरराष्ट्रीय पातळीवरून संतपद बहाल झाले, हा या दोन थोर समाजसेविकांचा गौरव निश्चितच आहे. तो माझ्या दृष्टीने

समाजसेवी क्षेत्रात कार्य करणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांचा सन्मानही आहे. परंतु अद्यापही केंद्र शासनाने थोर क्रांतिकारक समाजसेवक महात्मा ज्योतिबा फुले यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान बहाल न करणे हा एका महामानवाच्या कार्याचा अवमान आहे, असे मला नम्रपणे वाटते.

## बंधुतेची व्याख्या आणि बंधुतेची भाषा

बंधुतेची कास धरल्याशिवाय स्वातंत्र्याचा सूर्य उगवणार नाही; आणि स्वातंत्र्याचा सूर्य उगवल्याशिवाय विषमतेचा काळाकुट्ट अंधकार नाहीसा होऊन समतेची सकाळ होणार नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. त्यासाठी बंधुतेची भाषा बोलावी लागेल, बंधुतेचे साहित्य लिहावे लागेल आणि बंधुतेचेच पोवाडे गावे लागतील, गाणीही बंधुतेचीच म्हणावी लागतील, भावगीते, लोकगीते, भक्तिगीते आणि शौर्यगीतेही बंधुतेचीच गावी लागलीत. कशी करता येईल बंधुतेची व्याख्या, काय असावी बंधुतेची भाषा ?

माझ्या मते जातीचे कुंपण छेदून माणसाला माणूस म्हणून जोडणारे महनीय मूल्य म्हणजे बंधुता. धर्माच्या भिंती उद्ध्वस्त करून माणसाला माणूस म्हणून जोडणारे मूल्य म्हणजे बंधुता. भाषा आणि प्रदेशाच्या मर्यादा पार करून माणसाला माणूस म्हणून जोडणारा विचार म्हणजे बंधुता. स्त्री वा पुरुष हा भेद बाजूला सारून समतेचा आणि समानतेचा उद्घोष करणारा सद्विचार म्हणजे बंधुता. वयाचे अंतर दूर करून माणसामाणसांमध्ये मैत्रीभाव निर्माण करणारा आचार म्हणजे बंधुता. राज्याची हद्द पार करून माणसाला माणून म्हणून जोडणारा मूल्यविचार म्हणजे बंधुता आणि राष्ट्राची सरहद्द पार करून माणसाला माणूस म्हणून जोडणारा वैश्विक मूल्यविचार म्हणजे विश्वबंधुता होय.

बंधुतेची भाषा अगदी सहज आणि सोपी आहे. कधी जाती-धर्माच्या नावाने तर कधी भाषा-प्रदेशाच्या नावाने कापड फाडावे तसा समाज टराटरा फाडला जातो आहे. अशावेळी सुई-दोरा हातात घेऊन फाटला जाणारा हा समाज शिवण्याची आणि दुभंगला जाणारा हा समाज सांधण्याची भाषा असते बंधुता. क्रोधाची नव्हे तर प्रेमाची भाषा असते बंधुता. लोभाची नव्हे तर त्यागाची भाषा असते बंधुता. पेटविण्याची नव्हे तर पटविण्याची आणि विझविण्याचीही भाषा असते बंधुता. एकता, एकात्मता आणि अखंडतेचा उद्घोष करणारी भाषा असते बंधुता. सामाजिक न्यायासाठी विद्रोहाची भूमिका घेणारी भाषा असते बंधुता. अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यावर वज्राघात करणारी भाषा असते बंधुता. सुखी माणसाचे सुख अधिक फुलविणारी आणि दु:खी माणसाचे अश्रू पुसणारी भाषा असते बंधुता. मुक्या माणसांची वाणी, आंधळ्यांचे डोळे आणि पांगळ्यांचे पाय होण्याची भाषा असते बंधुता. तहानलेल्यांची तहान आणि भुकेल्यांची भूक भागविण्याची दानत असलेली भाषा असते बंधुता. मानवतेची पूजा बांधण्याची आणि माणुसकीची उपासना करण्याची भाषा असते बंधुता. फक्त बोलक्या समाजसुधारकांची नव्हे, तर कर्त्या कार्यकर्त्यांची भाषा असते बंधुता. केवळ व्याकरणातून आकारलेली नव्हे, तर खऱ्या अंत:करणातून साकारलेली भाषा असते बंधुता. मानवी समाजाला भयमुक्त, चिंतामुक्त आणि बंधमुक्त करण्याचा प्रयत्न करणारी भाषा असते बंधुता. कारण बंधुता ही केवळ भाषा नाही, केवळ मूल्य नाही, तर ती आहे एक समृद्ध जीवनप्रणाली आणि तत्त्वप्रणालीही. तो जगण्याचा आणि जगविण्याचाही धर्म आहे. त्याचे आचरण केले पाहिजे प्रत्यक्ष कृतीतून, कधी वाणीतून, तर कधी लेखणीतूनही.

## बंधुता साहित्याचा आणि संमेलनाचा उगम

या जगातील कोणतीही क्रांती ही शस्त्राच्या जोरावर झाली नाही, ती लेखणीच्या जोरावर आणि शब्दसामर्थ्याच्या बळावर झाली आहे, हा इतिहास आहे. हा इतिहास कदापिही विसरून चालणार नाही.

माझ्या मते तथागत भगवान गौतम बुद्ध, भगवान महावीर आणि संत कबीर यांचे मूल्यविचार हेच बंधुता साहित्याचे उगमस्थान आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम आदी सकळ संतांनी त्याला मूर्त रूप देऊन जनमानसात त्याचा गजर केला. पुढे महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आगरकर अशा प्रज्ञावंत समाजसुधारकांनी त्यामध्ये प्राण ओतले. साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्यासारख्या प्रतिभेचे लेणे जन्माला घेऊन आलेल्या साहित्यिकाने हे साहित्य सातासमुद्रापार पोहोचवले. पुढे तर हे साहित्य अधिकच बहरले आणि पाहता पाहता दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्री साहित्य आणि आदिवासी साहित्य हे नवीनच दमदार आणि कसदार असे साहित्य प्रवाह अस्तित्वात आले. या जिवंत साहित्य प्रवाहांनी संपूर्ण जगाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले.

तथागत भगवान गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानाचे आणि जीवनकार्याचे एक वैशिष्ट्य असे, की रक्ताचा एक बिंदूही न सांडता शांततामय मार्गाने स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता या विचारांचा आशियाभर प्रसार करणारा हा जगाच्या इतिहासातील पहिला महामानव आहे. त्यांच्या 'बंधुता' या मूल्याला करुणेचे अधिष्ठान आहे. करुणा या मूल्यासंबंधी बोलतांना भगवान बुद्ध असे म्हणतात, की 'जगातल्या

शेवटच्या माणसाच्या डोळ्यांतील शेवटचा अश्रू पुसला जाईपर्यंत मला मोक्ष नको.' करुणेचा इतका भव्य आणि उत्कट आविष्कार आपल्याला जगाच्या इतिहासात इतरत्र कोठेही पहावयास मिळणार नाही.

तथागत भगवान बुद्धांच्या काळात तीन आणि त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर प्रजापिता सम्राट अशोकाच्या काळामध्ये तीन धम्मसंगिती झाल्या. या संगितीमध्ये धम्म तत्त्वज्ञानाबरोबरच सत्य, अहिंसा, शांती, संयम, करुणा, समता आणि

समानता, एकता आणि एकात्मता समस्त मानवी जीवनाला सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध करणाऱ्या या मूल्यविचारांना प्रस्तुत करून त्यांची मानवी समाजात प्रस्थापना करण्याचे संकल्पित करण्यात आले. या ऐतिहासिक संगिती म्हणजे त्याकाळातील साहित्य संमेलनेच होत. माझ्या दृष्टीने नालंदा (पाटणा) आणि तक्षशिला (रावळपिंडी) या तत्कालीन विश्वविद्यालयांचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे.

तथागतांनी सांगितलेले प्रज्ञा, शील, करुणा, सत्य आणि अहिंसा हे पंचशील तत्त्वज्ञान संपूर्ण जगाने स्वीकारले. पंडित जवाहरलाल नेहरू हे स्वतंत्र भारताचे पंतप्रधान असताना चीनने स्वत: पुढाकार घेऊन भारत आणि चीनचे संभाव्य युद्ध टाळण्यासाठी एक सामंजस्य करार केला. तो 'पंचशील करार' या नावानेच जगप्रसिद्ध आहे. पुढे या कराराचे उल्लंघन करून १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्याला भारतीय सैनिकांनी चोख उत्तर दिले; आणि चीनला आपले सैन्य मागे घेण्यास भाग पाडले हे वेगळे सांगायला नको.

भगवान महावीर यांनी सांगितलेला अनेकांतवाद मला अतिशय महत्त्वाचा वाटतो. जे जे मंगल आहे, ते ते आपल्याला स्वीकारले पाहिजे आणि जे जे अमंगल आहे त्याचा त्याग केला पाहिजे असेच त्यातून त्यांना सांगायचे असेल. मानव्याला जे जे तारक आहे ते ते स्वीकारावे आणि जे जे मारक आहे ते ते नाकारावे असेच त्यांना त्यातून सूचित करावयाचे आहे. त्यांनी काम, क्रोध, मोह, मद आणि मत्सर या षड्रिपूंवर मात करून शांती, संयम, सदाचार आणि शाकाहाराची शिकवण दिली.

भारतीय साहित्याच्या सागरात आपल्या प्रतिभेची, भक्तीची, माणूसपणाची भावगंगा निर्माण करण्याचे महान कार्य संत कबीरांच्या रसमय वाणीने केले. जीवनभर लेखणी हातात न धरलेल्या या महान संताने भारतीय संस्कृतीला आणि साहित्याला उजळून टाकले. भाषा कोणतीही असली, तरी उत्कट भावानुभव असेल, तर त्या काळाचा प्रभाव कायम चिरकाल टिकून राहतो. त्यांची कविता भारताच्या सीमा ओलांडून साऱ्या विश्वात पोहोचली. मानवतेचे गाणे गाणारा कवी म्हणून त्यांची ओळख झाली. कबीरांच्या शब्दातून आणि वाणीतून मानवी कल्याणाचे सुंदर चित्र साकारले. त्यांचा प्रत्येक दोहा माणुसकीचे दर्शन घडवितो. मानवी मनाला निर्मळ प्रेमभावनेचे आनंदगाणे देत राहतो. ते म्हणतात ...

**'सुखीया सब संसार है खावै अरू सोवै !**
**दु:खिया दास कबीर है जागेये भरू रोवै !!'**

या काव्यपंक्ती वाचतांना मनातला शूद्र भाव क्षीण होऊन जातो. जो विचारांनी जागा झाला, तो अंतर्मुख होऊन जीवनाचा विचार करतो. जो कधीच जागा होत नाही, जो सुंदर जीवनाचा विचार करीत नाही त्याच्या दृष्टीने सगळं जग सुखी असतं. अंधार आणि उजेडाचा कुणाला न समजणारा खेळ जेव्हा संत कबीरांनी पाहिला, तेव्हा करुणेचे आणि प्रेमाचे असंख्य झरे त्यांच्या शब्दातून वाहू लागले.

**'पोथि पढी पढी जग मुआ, पंडित भया न कोय !**
**ढाई अक्षर प्रेम का, पढै सो पंडित होय !!'**

पोथ्या आणि पुराणे वाचून किंवा तोंडपाठ करून या जगात कोणीही ज्ञानी अथवा विद्वान होऊ शकत नाही. जे स्वत:ला पंडित म्हणवून घेतात, ते ढोंगी, अज्ञानी असतात. हृदयस्थ प्रेमाचा पवित्र झरा ज्यांच्या आचार, विचारांतून अखंडित वाहत असतो, असा अडाणी माणूस खरा ज्ञानी आणि विद्वान असतो. प्रेम ही अडीच अक्षरे दिसायला छोटी असली, तरी या अक्षरांमध्ये साऱ्या विश्वाला कवेत घेण्याचे सामर्थ्य आहे. कबीरांचे असे दोहे हे लाख मोलाचे आणि सुवर्ण तोलाचेच आहेत. संत कबीरांचे हे विचार सामाजिक समतेचे, एकात्मतेचे, मानवतेचे आणि बंधुतेचेच आहेत. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तथागत भगवान गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा फुले यांना आपले गुरू मानले.

त्यानंतर ज्ञानेश्वर, तुकाराम, मुक्ताबाई, एकनाथ, सावता, चोखोबा, गोरोबा, कान्होबा आदी संतांनी आपल्या अभंगातून सामाजिक समतेचा जयघोष केला. महात्मा बसवेश्वरांनी कृतिशील बंधुता, समता आणि मानवता या मुल्यांना सर्वाधिक महत्त्व दिले. त्यांनी आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देऊन ब्राह्मण आणि शूद्रांचे विवाहही घडवून आणले. स्त्री-पुरुष समानतेचा उदार विचार मांडला. स्त्रियांच्या शक्तीची, प्रतिभेची आणि कर्तृत्वाची जाणीव त्यांनी समाजाला

करून दिली. परंतु खऱ्या अर्थाने पुढे महात्मा फुले यांनी 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा आसूड' या साहित्यकृतींमधून महाराष्ट्राची सांस्कृतिक चळवळ अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न केला. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी 'काव्यफुले' हा कवितासंग्रह लिहून त्यामध्ये मोलाची भर घातली. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवमुक्तीची एक चळवळच उभी केली. त्यासाठी त्यांनी आपली वाणी आणि लेखणी झिजवली. त्यांची ज्ञानसंपदा आणि ग्रंथसंपदा यामुळे ही चळवळ अधिकच गतिमान झाली. त्यातून प्रा. रा. ग. जाधव, बाबा भारती, कविवर्य बाबुराव बागूल, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. यशवंत मनोहर, पद्मश्री नारायण सुर्वे, डॉ. शंकरराव खरात, डॉ. केशव मेश्राम, पद्मश्री नामदेव ढसाळ, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, राजा ढाले, दया पवार, डॉ. दत्ता भगत, प्रेमानंद गज्वी, अर्जुन डांगळे, डॉ. शरणकुमार लिंबाळे, डॉ. प्रज्ञा लोखंडे, लहू कानडे, वामन निंबाळकर, डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. रूपा कुलकर्णी, डॉ. तारा भवाळकर, प्रा. अरुण कांबळे, प्रा. रामनाथ चव्हाण, लक्ष्मण माने, प्रा. रतनलाल सोनाग्रा, डॉ. हरी नरके, अरुण खोरे, लक्ष्मण गायकवाड, डॉ. मनोहर जाधव, डॉ. माधवी खरात अशा साहित्यिकांची पिढीच निर्माण झाली. त्यांच्या कसदार लेखणीने आणि धारदार वाणीने प्रस्थापित, बंदिस्त साहित्याला हादरे द्यायला सुरुवात केली. त्यातच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने प्रेरित होऊन लोककवी वामनदादा कर्डक, लोकगायक प्रल्हाद शिंदे, जलसाकार भीमराव कर्डक, भीमशाहीर विठ्ठल उमप यांच्यासारखी कवी, गायक, कलावंत यांची फौजच उभी राहिली आणि त्यांनी सांस्कृतिक सत्ता, सामाजिक सत्ता आणि थेट राजसत्तेलाच जाब विचारायला सुरुवात केली. वामनदादा म्हणतात,

'स्वातंत्र्याचा अर्थ हा कळू द्या,
आता तरी गरिबाला घास मिळू द्या.'

या प्रभावाने बघता-बघता दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्री साहित्य, आदिवासी साहित्य असे दमदार साहित्यप्रवाह प्रवाहित झाले. खऱ्या अर्थाने साहित्य हे बहुजन समाजापर्यंत पोहोचले. या साहित्य प्रवाहांनी भविष्यकाळातही गतिमान राहण्याची नितांत आवश्यकता आहे. या सगळ्या प्रवाहांना आपल्या कवेत घेण्याची क्षमता बंधुता साहित्यात आहे, असे मला वाटते. कारण या सर्वच साहित्याचा आक्रोश आणि विद्रोह हा स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांच्या मागणीसाठीच तर आहे.

## मराठी भाषेची अनाठायी चिंता

काही मंडळी आपल्या मुलाबाळांना आणि नातवंडांनाही इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये घालतात. इंग्रजी माध्यमांच्या वाढत्या शाळांमुळे मराठी भाषा संपेल की काय अशी अनाठायी चिंता व्यक्त करीत राहतात. ही मंडळी आपल्या कुटुंबातील व्यक्तींशीही इंग्रजीत बोलत राहतात. आपल्या कुटुंबामध्ये मराठी बोलण्याचे साधे पथ्यही पाळतांना दिसत नाहीत.

मी मात्र आपल्याशी लबाडी करणार नाही. आपण आता गावात, शहरात किंवा फक्त देशात नाही आहोत, तर जगात आहोत याचे भान आपल्याला आहे. जगाची भाषा आहे इंग्रजी. तेव्हा इंग्रजी शिकण्याची आवश्यकताच आहे. आपल्या माध्यमाची भाषा इंग्रजी असली तरी आपल्या काळजाची भाषा ही मराठीच असते. आम्ही इंग्रजी भाषेत लिहित असलो तरी विचार मात्र मराठी भाषेमधूनच करतो. केवळ फक्त भाषांतर लिहित असतो. वर्तमानपत्राचा सगळ्यात जास्त वाचक हा मराठी भाषेचाच आहे. सर्वच कुटुंबात एकत्रितरीत्या मराठी बातम्यांनाच पसंती दिली जाते. मराठी मालिका प्राधान्याने बघितल्या जातात आणि इतर भाषेमधील मालिका बघितल्या तरी त्या समजून मात्र मराठीतूनच घेतल्या जातात. मराठी लोकगीते आणि भावगीतेच आपल्या ओठांवर अधिक खिळून राहतात. अंगाईगीते, भजने, कीर्तने आणि इतर सांस्कृतिक कलाक्षेत्राचे अधिराज्य आपल्या मनावर अजूनही अबाधित आणि टिकून आहे, हे विसरता कामा नये.

मराठी माणूस हा समाजप्रिय आहे. समूहाने राहण्याचीच त्याची प्रवृत्ती आणि गरज आहे. समाजामध्ये तो मातृभाषेतून म्हणजे मराठी भाषेतूनच आपले दैनंदिन व्यवहार करीत असतो. तेव्हा मराठी भाषेबद्दल अधिक चिंता बाळगण्याचे अजिबात कारण नाही. सावधगिरी बाळगून काही उपाययोजना करीत राहणे हे व्यवहार्य आहे. त्यासाठी काही प्रोत्साहन योजना राबविणे गरजेचे आहे. सामूहिक पातळीवर काही कार्यक्रम आणि उपक्रम राबविणे अगत्याचे आहे. शैक्षणिक क्षेत्रामध्ये काही ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. अशा उपाययोजना सुचविण्याची जबाबदारी ही प्रामुख्याने साहित्यिकांचीच आहे, हे विसरता कामा नये.

## मराठी भाषेचे संवर्धन

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा हा मिळायलाच हवा. 'मराठी भाषा विद्यापीठ' स्थापन व्हायला हवे.

त्यासाठी साहित्यिकांनी पाठपुरावा करायला हवा. मराठी भाषेतील साहित्य हे इतर भाषांमध्ये अनुवादित व्हायला हवं आणि इतर भाषेतील साहित्य हे मराठी भाषेमध्येही अनुवादित व्हायला हवं. साहित्य हे शेवटच्या घटकापर्यंत पोहोचायला हवं. त्यासाठी काही योजना राबविल्या पाहिजेत. उदा. गाव तेथे ग्रंथालय. प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या गावात ग्रंथालय सुरू केले पाहिजे. शासनाने तसे बंधन घालावे आणि त्यासाठी दरवर्षी स्वतंत्र निधी उपलब्ध करून द्यावा. या ठिकाणी गरजू विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी अभ्यासिका आणि संवादिकाही सुरू कराव्यात. १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या राष्ट्रीय उत्सवांच्या दिवशी आपल्या गावातील साहित्यिकांचा आवर्जून पुरस्कार देऊन उचित असा सन्मान करावा.

महानगरपालिका, नगर परिषदांमध्ये स्वतंत्र सांस्कृतिक विभाग सुरू करावा. या विभागाच्या नियंत्रणाखाली ग्रंथालये चालवावीत. त्यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करावी. गरजू विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका आणि संवादिकांची सोय करावी. नवोदित साहित्यिक आणि प्रथितयश साहित्यिक यांच्या सन्मानासाठी पुरस्कार योजना राबवावी. तसेच साहित्यकृतींच्या प्रकाशनासाठी अनुदान द्यावे. साहित्यिक उपक्रम राबवावेत. पुस्तक प्रदर्शनासारखे उपक्रम सुरू करावेत.

## स्वतंत्र विदर्भाची मागणी

स्वतंत्र विदर्भाच्या मागणीमध्ये जशी विकासाची आस आहे, तसाच राजकारणाचाही वास आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात १०५ लोकांनी हौतात्म्य पत्करले. त्यांचे बलिदान महाराष्ट्राची जनता अजिबात व्यर्थ जाऊ देणार नाही. खरेतर विभक्त होण्याने प्रश्न सुटत नाहीत, उलटपक्षी वाढतात. एकत्र राहिल्याने प्रश्नही सुटतात आणि सामूहिक ताकदही वाढते.

## भारतीय संविधान

भारतीय संविधानाची निर्मिती हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन कार्यातील महान आणि सर्वश्रेष्ठ असे योगदान आहे. विविध जाती-धर्म आणि प्रचंड लोकसंख्या असलेला आपला भारत देश हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. ही लोकशाही टिकविण्याचे सर्व सामर्थ्य या संविधानात आहे. या संविधानाच्याप्रती आम्हा सर्व भारतीयांना अतीव असा अभिमान आणि आस्था आहे. विकेंद्रित अशा लोकशाहीप्रधान देशातील सर्व लोकप्रतिनिधींना आणि त्यांना निवडून देणाऱ्या मतदार नागरिकांना या संविधानाचे आवश्यक ते ज्ञान असायला हवे. त्यासाठी कोणत्याही निवडणुकीच्या वेळी लोकप्रतिनिधींनी आपला उमेदवारी अर्ज सादर करताना त्यामध्ये तशा आशयाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक असावे, असे मला वाटते.

त्याचप्रमाणे स्वतंत्र भारतात एक सुजाण आणि सुसंस्कृत नागरिक घडविण्यासाठी नव्या पिढीतील तरुणवर्गास मतदानाचा अधिकार प्राप्त होण्यापूर्वीच म्हणजे वयाच्या अठराव्या वर्षी भारतीय लोकशाही आणि संविधानाबद्दलची माहिती, त्यासंबंधीचे आवश्यक ते ज्ञान असणे गरजेचे आहे. म्हणून सर्व माध्यमातील इयत्ता बारावीच्या अभ्यासक्रमात संविधानाची उद्देशिका आणि त्याबद्दलची माहिती असलेल्या स्वतंत्र पाठाचा अंतर्भाव करावा, असे माझे मत आहे. 'एक मत आणि समान पत' हा आपल्या संविधानाचा मूलमंत्र खरोखरच अगदी महान आहे.

## अॅट्रॉसिटीचा कायदा

'जगा आणि जगू द्या' हे भारतीय समाजाने अंगीकारलेले तत्त्वज्ञान मला अतिशय मोलाचे वाटते. त्याला अनुसरून केंद्र वा राज्यशासनाने भारतीय संविधानाला प्रमाणभूत मानून कारखानदारांकडून कामगारांवर, प्रशासनाकडून कर्मचाऱ्यांवर, पुरुषांकडून स्त्रियांवर, बलवानांकडून दुर्बलांवर, पालकांकडून बालकांवर (बाल कामगार), धनिकांकडून निर्धनांवर, संघटितांकडून असंघटितांवर, संचितांकडून वंचितांवर, व्यावसायिकांकडून मजुरांवर अन्याय आणि अत्याचार होऊ नयेत म्हणून त्या त्या प्रसंगी कायदे केलेले आहेत. तशाच प्रकारे बहुसंख्याकांकडून अल्पसंख्याकांवर अन्याय आणि अत्याचार होऊ नयेत, त्यांना तात्काळ योग्य तो न्याय मिळावा, तसेच अन्याय करणाऱ्या प्रवृत्तींना आळा बसून त्यांना योग्य ती शिक्षा तात्काळ व्हावी या उद्देशाने केंद्र शासनाने 'अॅट्रॉसिटी' हा कायदा केलेला आहे, हे आपण ध्यानात घ्यायला हवे. अद्यापही अल्पसंख्याक समाज हा पूर्णपणे सुरक्षित नसून त्यांच्यावरील अत्याचारांवर सातत्याने वाढच होताना दिसून येते, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. सध्या मात्र या कायद्याचा गैरवापर होत असल्याची तक्रार काही राजकीय मंडळी आपल्या राजकीय स्वार्थापोटी कोणत्याही पुराव्याशिवाय करीत आहेत हे सर्वस्वी गैर आहे. यातील सत्यता पडताळून पाहण्यासाठी पोलीसयंत्रणा आणि न्याययंत्रणा सक्षम नव्हेत काय ?

## साहित्यिक आणि कलावंत यांच्यापुढील आव्हाने

आपल्या धर्माचा अभिमान असणे हा माझ्यादृष्टीने सद्‌गुण आहे, तर आपल्या धर्माचा दुराभिमान बाळगणे हा

दुर्गुण आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. परंतु काही दूराभिमानी समाजविघातक मंडळी मुद्दाम खोडसाळपणे धर्माधिष्ठित राष्ट्राची कल्पना मांडतात. विशिष्ट धर्मग्रंथाला राष्ट्रग्रंथ असे केविलवाणे सांगण्याचा प्रयत्न करतात हे इष्ट नव्हे. अल्पसंख्याक समाजामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण करून त्यांच्या मनामध्ये गोंधळ निर्माण करण्याचे हे कुटिल कारस्थान आहे. अशावेळी समाजाला योग्य मार्गदर्शन करण्याची आणि या प्रवृत्तीविरुद्ध लढण्याची जबाबदारी साहित्यिक आणि कलावंतांना नाकारून चालणार नाही. याविरुद्ध आवाज उठविणाऱ्या डॉ. नरेंद्र दाभोळकर, कॉ. गोविंदभाई पानसरे आणि कलबुर्गी यांच्यासारख्या पुरोगामी विचारांच्या विचारवंतांच्या हत्या घडवून आणल्या गेल्या म्हणून भयभीत होणे योग्य नाही. केवळ 'पुरस्कार वापसी' हा कार्यक्रम परिपूर्ण नाही. ते केवळ निषेधाचे एक माध्यम असू शकते. आपल्या निर्भय लेखणीतून आणि निर्भीड वाणीतून लढा उभारणे आणि सर्वच स्तरातील लोकांना त्यामध्ये सामावून घेण्याची जबाबदारी आपल्याला स्वीकारावीच लागेल. कारण तटस्थता हा भ्याडपणा आहे.

दहशतवाद हे तर जागतिक स्तरावरील मोठे आव्हान आहे. धर्मांधता आणि जातीयता कमी झालेली नाही. धार्मिक आणि जातीय संघटना अधिक बळकट होताना दिसतात. सहिष्णुता आणि विधायकता हे त्यावरील रामबाण औषध आहे. संविधानाने स्त्री आणि पुरुषांना समानतेचे आणि समतेचे अधिकार बहाल केलेले असताना कोणत्याही धर्माने त्यांना दुय्यमस्थान देणे चुकीचे आहे. मंदिरप्रवेश हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. कोणत्याही बाबतीत आपल्या आईचा, पत्नीचा, बहिणीचा किंवा मुलीचा सन्मान आणि प्रतिष्ठा जपणे हे प्रत्येक पुरुषाचे आद्यकर्तव्य आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. मात्र संपत्तीचे केंद्रीकरण होताना दिसते आहे हे भयावह आहे. त्यासाठी दारिद्र्यरेषेप्रमाणेच श्रीमंतीची रेषाही ठरवावी लागेल.

अल्पसंख्याकांवरील अत्याचार, बलात्कार, 'खाऊजा' संस्कृतीतून आलेली बेरोजगारी, भ्रष्टाचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बालकामगार या समस्यातून समाजाला चिंतामुक्त, भयमुक्त आणि बंधमुक्त करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची मिळून आहे.

माझे असे स्पष्ट मत आहे, की साहित्यिक, कलावंत आणि कवी हे प्रतिभासंपन्न असतात. प्रतिभा ही काही जन्माने प्राप्त होत नाही. ती वाचन, चिंतन, मनन, लेखन आणि संशोधन करून फार मोठ्या महाप्रयासाने अर्जित करावी लागते. प्रतिभासंपन्न व्यक्तीच साहित्य निर्मिती करू शकतात आणि काळीजओली माणसेच कविता लिहू शकतात.

साहित्यिक आणि कलावंत हे समाजाचे भाष्यकार आहेत. मूल्याधिष्ठित समाजनिर्मितीसाठी त्यांनी आपली लेखणी आणि वाणी झिजविल्यास बरेचसे प्रश्न आपोआप सुटतील, अशी माझी धारणा आहे. राजसत्तेला दिशादर्शन करण्याची जबाबदारी आपल्याला टाळता येणार नाही. आपल्या अनुभवांचे आणि ज्ञानाचे संचित हे समाजाच्या मालकीचे आहे. याचेही भान आपल्याला जपायला हवे. समाजाला अधिक सजग, सुंदर आणि स्वयंभू बनविण्यासाठी आपल्याला पुढाकार हा घ्यावाच लागेल. समाजाला महाभारत होण्यापासून वाचवायला हवे आणि एकविसाव्या शतकात पदार्पण करताना भारताला महासत्तेकडे न्यायला हवे. हे काम अधिक गतिमानतेने, नीतिमानतेने आणि गुणात्मक पद्धतीने साहित्यिक, विचारवंत आणि कलावंतच करू शकतात आणि त्यांच्याकडून ते निश्चितपणे होईल, असा मला विश्वास वाटतो.

## माणूस

'माणूस' या शब्दाने मला 'गोलपीठाकार' पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या कवितेची आठवण होते. मी त्यांच्या साहित्याचा आणि कवितेचा चाहता आहे. ते म्हणतात...

'माणसाने पहिल्या प्रथम स्वत:ला
पूर्ण अंशाने उद्ध्वस्त करून घ्यावे
नंतर उरल्यासुरल्यांनी कुणालाही
गुलाम करून लुटू नये
आभाळाला आजोबा आणि
जमिनीला आजी मानून,
त्याच्या कुशीत गुण्यागोविंदाने,
आनंदाने राहावे.
एक तीळ सर्वांनी करंडून खावा
माणसांवरच सूक्त करावे
माणसाचेच गाणे गावे माणसाने !'

'माणूस' या विषयीचे एक चिंतन आपल्यासमोर ठेऊनच याबाबतचे माझे मत स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो.

बऱ्याच वर्षांनी माझ्या मित्राच्या घरी एक अपत्य जन्माला येणार होते. अर्थातच आम्हा सर्वांच्या चेहऱ्यावर उत्सुकता, उत्साह आणि आनंद होता. बऱ्याच प्रतीक्षेनंतर अखेर तो क्षण उजाडला आणि बाळाचा जन्म झाला. आम्ही मनातल्या मनात सुटकेचा श्वास घेतला. परंतु दुसऱ्याच क्षणी ते बाळ जिवाच्या

आकांताने ओक्साबोक्सी रडू लागले. तेव्हा माझे चिंतनशील मन अधिकच चिंतित झाले आणि मी विचार करू लागलो, की एका क्षणापूर्वी जन्माला आलेले हे बाळ एवढे का बरे रडत असेल? माझे मला उत्तर मिळाले.

बाळ जन्माला आले. क्षणभर त्याने आपल्या वात्सल्यमूर्ती आईकडे थोडे स्मित करून पाहिले. मग मात्र आपल्या सुंदर नजरेने सर्व घर न्याहाळले आणि तात्काळ त्याच्या लक्षात आले. अरे आता हे मला हिंदू करणार, मुस्लीम करणार, बौद्ध करणार, ख्रिश्चन करणार, शीख करणार, जैन करणार आणि त्याहीपुढे जाऊन कोणत्यातरी जातीची पट्टी माझ्या कपाळावर घट्टपणे चिकटविणार. पण मला तर जन्म घ्यायचा होता एक 'माणूस' म्हणून त्याचे काय?

आपल्या देशात माणूस पहिला जातीत जन्माला येतो आणि नंतर धर्मात बंदिस्त होतो. जन्माला आल्याबरोबर त्याचे हिरावलेले माणूसपण सिद्ध करण्यासाठी त्याला आयुष्यभर संघर्ष करावा लागतो. आतातर आपल्याला जातीची, धर्माची आणि देशाचीही मर्यादा पार करून थेट जगाशी नाते जोडावयाचे आहे. माझ्या मते शिक्षणाने माणूस डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, साहित्यिक, कलावंत वा कार्यकर्ता बनू शकतो. परंतु शिक्षणाला चांगल्या संस्कारांची जोड मिळाल्यास तो चांगला डॉक्टर माणूस, इंजिनिअर माणूस, वकील माणूस, शिक्षक माणूस, साहित्यिक माणूस, कलावंत माणूस, कार्यकर्ता माणूस होऊ शकतो. हे साहित्य संमेलन एक चांगला माणूस घडवण्याची पाठशाळा, कार्यशाळा आणि प्रयोगशाळाही आहे. माणूस हा या साहित्य संमेलनाचा केंद्रबिंदू आहे. मानवतेची उपासना करणे हाच खऱ्या अर्थाने आपला धर्म आहे.

माझ्या दृष्टीने साहित्यसेवा आणि समाजसेवा या दोन्हीही अंगांचा केंद्रबिंदू माणूस आहे. धर्मनिरपेक्ष भारतामध्ये सामाजिक बंधुभाव, जातीय सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेचे संवर्धन व्हावे, मूल्याधिष्ठित, समताधिष्ठित, बुद्धिप्रामाण्यवादी, विवेकनिष्ठ आणि समताधिष्ठित समाजनिर्मितीचे छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे स्वप्न साकार करण्यासाठी 'माणूस' केंद्रस्थानी ठेऊनच प्रयत्न करायला हवेत. त्यासाठी माणसाला अंधश्रद्धा, रूढी, परंपरा या साखळदंडातून

मुक्त करायला हवे, स्वयंसिद्ध, स्वयंप्रकाशी आणि स्वयंभू करायला हवे. त्यासाठी अंत:करणपूर्वक आजच कटिबद्ध होऊया. अर्थातच काही प्रज्ञावंतांनी त्यासाठी प्रयत्न केलेले आहेत, हाही इतिहास आहे. हा इतिहास गिरविण्याचा आपणही प्रयत्न करूया. त्यासाठी माणसाचे श्रेष्ठत्व अधोरेखित करणारी कविवर्य बाबूराव बागूल यांची कविता आपणासमोर सादर करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो. आपण मला अगदी कौतुकाने ऐकून घेतलेत त्याबद्दल आपणाला मनापासून धन्यवाद देतो आणि थांबतो.

कविवर्य बाबूराव बागूल म्हणतात..

''वेदाआधी तू होतास,
वेदाच्या परमेश्वरा आधी तू होतास,
पंच महाभूतांचे पाहून
विराट विक्राळ रूप
तू व्यथित, व्याकूळ होत होतास,
आणि हात उभारून
तू याचना करीत होतास,
त्या याचना म्हणजे ऋचा.
सर्व ईश्वरांचे जन्मोत्सव,
तूच साजरे केलेस.
सर्व प्रेषितांचे बारसेही
तूच आनंदाने साजरे केलेस.
हे माणसा,
तूच सूर्याला सूर्य म्हटले
आणि सूर्य, सूर्य झाला.
तूच चंद्राला चंद्र म्हटले
आणि चंद्र, चंद्र झाला.
अवघ्या विश्वाचे नामकरण
तू केलेस,
अन् प्रत्येकाने मान्य केले.
हे प्रतिभावान माणसा,
तूच आहे सर्व काही
तुझ्यामुळेच सजीव सुंदर,
झाली ही मही.''

■■■